# महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकिर्ण-२०२४/प्र.क्र.१७२/से-५,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला,नवीन मंत्रालय,
मुंबई - ४०००01.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

१. आयुक्त आरोग्य सेवा,
आरोग्य सेवा आयुक्तालय,
मुंबई.

२. संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई/पुणे

३. सहसंचालक, आरोग्य सेवा (हि. ह. व ज. रो) पुणे

विषय : सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रक्तपेढी तंत्रज्ञ, क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी व आहारतज्ञ यांची शैक्षणिक अर्हता तसेच स्वच्छता निरिक्षक अभ्यासक्रम,संस्थांबाबत प्राप्त निवेदने व त्यावरील मार्गदर्शन.

संदर्भ : शासन निर्णय क्र. पदभ २०२२/प्र.क्र. १०३६/सेवा-५ दि. १५.०३.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे दिनांक २३.०२.२०२४ चे पत्र तसेच याबाबत शासनस्तरावर प्राप्त झालेली समान विषयाची निवेदने व कागदपत्रे व पदभरती निकडता व संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुद लक्षात घेता खालील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

२. प्राप्त निवेदनातील मागण्या व त्यावरील विभागाचे अभिप्राय खालील तक्त्यामध्ये नमूद केलेले आहेत.

| अ.क्र | पदनाम | मागणी | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | रक्तपेढी तंत्रज्ञ/रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी **व** प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी/प्रयोगशाळा तंत्रज्ञ | या दोन्ही पदांच्या कामाचे स्वरुप बहुतांश समान आहे तसेच वेतनश्रेणी देखील समान आहे. तथापि, रक्तपेढी तंत्रज्ञासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी एक अर्हता : Bachelor of Science with physics and chemistry or biology अशी नमूद आहे परंतू प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदाकरीता Bachelor of Science with chemistry or | प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम दि. २९.०९.२०२१ रोजी सुधारित करण्यात आले. परंतू, कोविड-१९ महामारी दरम्यानच्या आरोग्य विभागाच्या पदभरतीकरीता आरोग्य २०२१ रोजीच्या भरती करीता रक्तपेढी तंत्रज्ञ/ रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम उपलब्ध नसल्याने वैद्यकिय शिक्षण विभागाने दि. २९.१२.२०२० रोजी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | biology or botony or zoology or microbiology or biotechnology or forensic Science अशी नमूद आहे. उर्वरित अर्हता Diploma in Medical lab Technology or Degree in bachelor of paramedical technology अशी समान आहे. | अधिसूचित केलेले सेवाप्रवेश नियम विभागाने लागू करण्याचा शासन निर्णय दि. ०४.०८.२०२१ रोजी घेतला होता. त्यामुळे, या पदाच्या Bachelor of Science अर्हतेमध्ये इतर पोटशाखांचा समावेश झालेला नाही.<br>यास्तव, मध्य मार्ग म्हणून सदर पदभरतीकरीता प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदाची Bachelor of Science मधील नमूद कोणत्याही पोटशाखा किंवा Bachelor of Science in physics or chemistry or biology अशी शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरुन याशिवाय सेवाप्रवेश नियमामध्ये नमूद उर्वरित शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरण्यास हरकत नाही. |
| २. | क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी | या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये Bachelor of Science with physics, Chemistry or biology and Diploma or Certificate in Radiography तसेच, Bachelor of paramedical technology in Radiography असे सेवाप्रवेश नियमात नमूद आहे.<br>यातही Bachelor of Science in physics or chemistry or biology and Diploma or Certificate in Radiography **or** Bachelor of paramedical technology in Radiography असे असणे उचित असल्याची मागणी व मार्गदर्शन सहसंचालक आरोग्य सेवा हिहवजरोग, पुणे यांनी मागविली आहे. | क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम दि. २९.०९.२०२१ रोजी सुधारित करण्यात आले. परंतू, कोविड-१९ महामारी दरम्यानच्या आरोग्य विभागाच्या पदभरतीकरीता आरोग्य २०२१ रोजीच्या भरती करीता क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम उपलब्ध नसल्याने वैद्यकिय शिक्षण विभागाने दि. २९.१२.२०२० रोजी अधिसूचित केलेले सेवाप्रवेश नियम विभागाने लागू करण्याचा शासन निर्णय दि. ०४.०८.२०२१ रोजी घेतला होता.<br>यामध्ये Bachelor of Science in physics or chemistry or biology and Diploma or Certificate in Radiography **or** Bachelor of paramedical technology in Radiography अशी शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरण्यास हरकत नाही. |
| ३. | आहारतज्ञ | सेवाप्रवेश नियमानुसार आहारतज्ञ या पदासाठी B.Sc Home Science अशी अर्हता नमूद आहे. परंतू, समुपदेनादरम्या अंतरिम | B.Sc Home Science या अभ्यासक्रमामध्ये सहायक आहारतज्ञ, आरोग्य सल्लागार, आरोग्य शिक्षक मुख्य उत्पादन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निवड यादीमध्ये उमेदवारांकडे B.Tech food technology पदवी प्रमाणपत्र असून त्यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांनी B.Tech Food Technology ही पदवी B.Sc Home Science या पदवीशी समकक्ष असल्याचे नमूद केलेल आहे.<br>तसेच, B.Sc Agriculture हे B.Tech Food Technology या पदवीस समकक्ष असल्याचेही प्रमाणपत्र काही उमेदवारांनी सादर करुन त्यांना आहारता या पदाकरीता पात्र ठरविण्याची विनंती केलेली आहे. | कार्यकारी यापदांसाठी तसेच, रुग्णांना त्यांचे आजारपणानुसार कोणत्या स्वरुपाचा आहार द्यावा याबाबतचे शिक्षण देण्यात येते. परंतु, B.Tech Food Technology यामध्ये फूड प्रासेसिंग, फूड प्रिझर्विंग, फुड डिस्ट्युब्रुशन बेकरी व रेस्ट्रोरंट यासंबंधीचे शिक्षण आहे.<br>आरोग्य विभागातील आहारतज्ञाची पदे ही संपुर्णत: रुग्ण सेवेशी संबंधित असल्याने B.Sc Home Science ही पदवी आहारतज्ञ या पदासाठी ग्राह्य धरण्यास हरकत नाही. |
| ४. | आरोग्य पर्यवेक्षक | आरोग्य पर्यवेक्षक या पदासाठी शैक्षणिक अर्हता विज्ञान शाखेतील पदवी असे नमुद आहे. तथापि, समुपदेशनाकरीता अंतरिम गुणवत्ता यादीत काही उमेदवार हे बीएससी विज्ञान ऐवी बीएएमएस पदवी धारक आहेत.<br>त्यांना आरोग्य पर्यवेक्षक पदासाठी पात्र ठरविणेबाबतची उमेदवारांकडुनही निवेदने प्राप्त आहेत. | या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, अशा समान प्रकरणांमध्ये आरोग्य पर्यवेक्षक या पदासाठी बीएएमएस ही पात्रता देखील ग्राह्य धरणेबाबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. २५१६/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०६.०७.२०१२ रोजी निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, The Degree of B.Sc is obtained after completion of three years after १२ standard whereas, degree of BAMS can be obtained after prosecuting studies of ४ ½ years after १२ standard. After completion of that course there is internship of १ year and entry can not be construed to mean that other candidates having similar or better qualification can not be considered......<br>We declare that present petitioner with qualification of BAMS from the recognized University is also to be considered to be eligible for competing the |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | direct recruitment to the post of Health Supervisor.<br>या न्यायालयीन प्रकरणात आरोग्य विभागदेखील प्रतिवादी होता आता, ग्रामविकास विभागानेदेखील BAMS अर्हता धारकांना आरोग्य पर्यवेक्षक पदासाठी आलेल्या उमेदवारांना पात्र ठरविले आहे त्यामुळे BAMS पदवी धारक उमेदवार जर गुणवत्ता यादीमध्ये असतील व त्या पदाच्या इतर आवश्यक अर्हतादेखील धारण करत असतील तर त्यांना या पदासाठी गुणवत्तेनुसार या पदभरतीसाठी पात्र ठरविण्यास हरकत नाही. |
| ५. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी/आरोग्य निरिक्षक /आरोग्य पर्यवेक्षक यापदासाठी आवश्यक असलेलस स्वच्छता निरिक्षक पदवीच्या अनुषंगाने. | भारत सेवक समाज (BSS) वोकेशनल एज्युकेशन या नीती आयोग तसेच केंद्रशासनाच्या गृहमंत्रालयाच्या संलग्न असलेल्या संस्थेकडून चालविण्यात येणाऱ्या स्वच्छता निरिक्षक या पदवी प्रमाणपत्राच्या तसेच, राष्ट्रीय व्यवसायिक शिक्षा एवं प्रशिक्षण समिती (National Board of Vocational training and Education) भारत सरकारद्वारा पंजीकृत स्वयंसंघटन या शासनमान्य संस्थेचे स्वच्छता निरिक्षक पदवी प्रमाणपत्र ग्राह्य धरणेबाबत. | भारत सेवक समाज ही तत्कालीन नियोजन आयोगाच्या मान्यतेने सन १९५२ मध्ये स्थापन झालेली संस्था आहे.<br>या संस्थेकडून Specialized Courses (Allied health Services) अंतर्गत Diploma in Sanitary health Inspector हे १ वर्षाचे प्रशिक्षण देण्यात येते.<br>सद्यस्थितीत विभागांतर्गत शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अथवा पीएचआय नागपूर येथून वैद्यकीय मुलभूत प्रशिक्षण कोर्स, अथवा केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून Sanitary Inspector प्रमाणपत्र धारकांना तसेच केंद्र शासनाच्या NIPHTR या संस्थेचा कोर्स ग्राह्य धरण्यात येतो. तसेच, या पदाशी समकक्ष या सदराखाली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड मुं, उपरि ता. नांदेड व प्रायवेट इंडस्ट्रियल ट्रेनिंग नागपूर, या तीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये तसेच, महाराष्ट्र शासनाने कौशल्य विकास मोहितेअंतर्गत शासन निर्णय दि. २५.०८.२०२३ अन्वये संलग्न १६ व दि. १५.०२.२०२४ अन्वये ५९ संस्थांमधीन या प्रशिक्षणाला समकक्ष म्हणून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विभागाने ग्राह्य धरलेले आहे.<br>तसेच, या विभागाच्या दि. १९.११.१९५८ च्या शासन निर्णयानुसार All India Institute of Local self Government या संस्थेंमधील ३० संस्थांना या प्रशिक्षणासाठी समतुल्य घोषित केलेले आहे.<br>समतुल्य घोषित केलेल्या संस्थांचा अभ्यासक्रम व भारत सेवक समाज तसेच राष्ट्रीय व्यवसायिक शिक्षा एवं प्रशिक्षण समिती (National Board of Vocational training and Education) भारत सरकारद्वारा पंजीकृत स्वयंसंघटन यांचेकडून शिकवण्यात येणारा अभ्यासक्रम समान आहे.<br>या संस्था केंद्र शासनाकडे नोंदणीकृत आहेत.<br>वैद्यकिय शिक्षण विभागानेदेखील भारत सेवक समाज संस्थेचा आरोग्य निरिक्षक पदवीका अभ्यासक्रम नियुक्ती व पदोन्नतीकरीत पात्र ठरविलेला आहे<br>यास्तव बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी/आरोग्य निरिक्षक /आरोग्य पर्यवेक्षक या पदासाठी भारत सेवक समाज (BSS) वोकेशनल एज्युकेशन या नीती आयोग तसेच केंद्रशासनाच्या गृहमंत्रालयाच्या संलग्न असलेल्या संस्थेकडून चालविण्यात येणाऱ्या स्वच्छता निरिक्षक या पदवी प्रमाणपत्राच्या तसेच, राष्ट्रीय व्यवसायिक शिक्षा एवं प्रशिक्षण समिती (National Board of Vocational training and Education) भारत सरकारद्वारा पंजीकृत स्वयंसंघटन अभ्यासक्रम आरोग्य विभागातील पदांसाठी या पदभरतीसाठी ग्राह्य धरण्यास हरकत नसावी. |

६. उपरोलेखील तक्त्यात मार्गदर्शनासाठी नमूद केलेल्या अर्हताव्यतिरिक्त् सेवाप्रवेश नियमा अंतर्भूत असलेल्या इतर कोणत्याही अर्हतेमध्ये यामुळे सुट मिळणे/बदल करण्यात आलेला नाही किंवा वगळण्यात आलेल्या नाहीत.

७. उपरोक्त नुसार गुणवत्ता यादीतील गुणवत्ता धारक व अर्हता प्राप्त उगमेदवारांना संपूर्ण कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरल्यास जाहिरातीनुसार उपलब्ध / शिल्लक असलेल्या पदांवर नियुक्ती देण्यास हरकत नसावी.

८. सदर पदभरतीदरम्यान विविध पदांवरील पदस्थापनेच्या अनुषंगाने उद्भवलेल्या अडचणी व त्याचे निराकरण करण्यासाठी भविष्यात सेवाप्रवेश नियमातील तरतुदीमध्ये सुस्पष्टता आणणे आवश्यक असल्यास त्यानुसार सेवाप्रवेश नियमातही सुधारणा करण्याबाबत प्रस्तावित करण्यात यावे.

Archana

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. उपसंचालक आरोग्य सेवा, सर्व परिमंडळे
२. जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालये सर्व